बृहन्मुंबई महानगरपालिका
सार्वजनिकआरोग्यखाते
क्र.एचओ/ 455 /दि.१०.०६.२०२२

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत साथरोग नियंत्रण कक्ष, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे पॉलीक्लिनिक व डायग्नोस्टिक सेन्टर आणि कोविड-१९ लसीकरण कार्यक्रम यांचे अहवाल पोर्टलवर अद्यावत करण्यासाठी कंत्राटी तत्वावर पदे भरण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने दि. १०.०६.२०२२ रोजीच्या जाहिरातीनुसार गुगल फोर्म https://bit.ly/EpidDEO1 वर दि.१२.०६.२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | पदनाम व संख्या | मानधन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | • संगणक चालक – कंत्राटी (Contractual) १६ साथरोग नियंत्रण कक्ष<br>• संगणक चालक – कंत्राटी (Contractual) १३ हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे पॉलीक्लिनिक व डायग्नोस्टिक सेन्टर<br>• संगणक चालक – कंत्राटी (Contractual) १० कोविड-१९ लसीकरण कार्यक्रम<br>• एकूण - ३९ | रु. १८०००/- | • उमेदवार कोणत्याही शाखेचा १२ वी पास असावा.<br>• उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (उच्चस्तर) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>• उमेदवाराकडे संगणक वापराबाबतचे MS- CIT अभ्यासक्रम ( ६ महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा असावा) शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमधून उत्तीर्ण झालेला असावा व याबाबतचे महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे.<br>• उमेदवाराकडे टंकलेखनाचे मराठी ३० श.प्र.मि.व इंग्रजी ४० श.प्र.मि. (६ महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा असावा) शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमधून उत्तीर्ण झालेले महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.<br>• एम. एस. वर्ड, एक्सेल व मुलभूत सांख्यिकिय तंत्राच्या संगणक प्रणालीची माहिती असावी. |

याची सविस्तर माहिती दि.१२.०६.२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत **https://bit.ly/EpidDEO1** गुगल फोर्म वर पाठविण्यात यावी. निवड झालेल्या उमेदवारांना दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्तीसाठी प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल तसेच संगणक चालक – कंत्राटी पदांना या कार्यालयात कोविड-१९ कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. आवश्यकते नुसार निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती केली जाईल. उर्वरीत उमेदवारांची प्रतिक्षा यादी या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल व गरजेनुसार नियुक्ती दिली जाईल. दि. १२.०६.२०२२ रोजी दुपारी ४.०० नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सही/**
**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

सर्वसाधारण अटी:

1. कोविडच्या NHP पोर्टलवर माहिती भरण्यासाठी शासकीय आणि खाजगी रुग्णालयांशी संपर्क साधने. तसेच कोविड-१९ लसीकरण कार्यक्रम आणि हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे पॉलीक्लिनिक व डायग्नोस्टिक सेन्टर मध्ये संगणकावर दैनंदिन अहवाल भरण्यात येतील.
2. आवश्यकते नुसार निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती केली जाईल. उर्वरीत उमेदवारांची प्रतिक्षा यादी या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. कोविड रुग्ण संख्येत वाढ झाल्यास आवश्यकता भासल्यास प्रतिक्षा यादीनुसार नियुक्ती केली जाईल. तसेच कोविड रुग्णंसंख्या कमी झाल्यास कोणतीही सूचना न देता सेवा खंडीत केली जाईल.
3. मी याअन्वये प्रतिज्ञा पूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहीरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार भी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.
4. सर्व दृष्टीने परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अर्हता प्राप्त व प्राथमिक चाचणीत निवड झालेल्या उमेदवाराची मराठी व इंग्रजी टंकलेखनाची तसेच इतर संगणक विषयी चाचणी घेण्यात येईल.
5. अर्ज विहित नमुन्यात https://bit.ly/EpidDEO1 या लिंक वर भरण्यात यावे. विहित नमुन्यामधे नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
6. उमेदवाराने स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदाच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात, उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झालेली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.
7. पत्रव्यवहाराचा पत्ता, संपर्क दूरध्वनी क्रमांकासह सुस्पष्ट व पूर्ण असावा.
8. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबद्दलचा तपशिल देणे आवश्यक आहे.
9. या कंत्राटी पध्दतीवरील नियुक्तीमुळे संगणक चालकाला बृहन्मुंबई महानगरपालिकेतील इतर कोणत्या पदावर नियमित तत्वावरील नेमणुकीसाठी हक्क सांगता येणार नाही.
10. निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**सही/**

**उपकार्यकारी आरोग्य अधिकारी**

**(साथरोग नियंत्रण कक्ष)**